आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ मार्च २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- २९ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधे व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडर्सचं वितरण राज्य सरकारांमार्फत सुरु

- पीएनजी जोडणी धारकांनी एलपीजी जोडणी परत करावी असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचं आवाहन

- कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीत वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून या माध्यमातून शेतीचा उत्पादन खर्च २५% कमी झाला असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- पुद्दुचेरीसह ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर होणार

**आणि**

- बीसीसीआयचा नमन पुरस्कार प्रदान सोहळा आज नवी दिल्लीत

**<><><><><>**

व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडर्सचं वितरण राज्यसरकारांकडे सोपवलं असून २९ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधे ते सुरु झालं आहे. अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सचिव सुजाता शर्मा यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. एलपीजी सिलेंडरची मागणी ऑनलाईन नोंदवावी, त्याकरता वितरकांच्या आस्थापनांसमोर रांगा लावू नये, असं आवाहन त्यांनी ग्राहकांना केलं.

**<><><><><>**

देशातल्या ज्या घरांमध्ये इंधनासाठी पीएनजी अर्थात पाईप द्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरु आहे, त्यांनी एलपीजी सिलिंडर वापरू नयेत आणि पीएनजी वापरणाऱ्यांच्या नावे सिलिंडर जोडण्या असल्यास त्यांनी त्या परत कराव्यात असं सरकारने म्हटलं आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने काल याबाबतची अधिसूचना जारी केली. जिथे पाईप गॅस च्या जोडण्या नाहीत अथवा त्यासाठी काम सुरु आहे, अशा ठिकाणी या जोडण्या देण्याचं काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश मंत्रालयाने दिले आहेत.

जिथे अद्याप पाईप गॅस पोचलेला नाही, तिथे एलपीजी सिलिंडर पुरवठा प्राधान्याने करता यावा यासाठी हा आदेश काढल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

पश्चिम आशियातल्या संघर्षाचा इंधन आयातीवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पादित होणाऱ्या वायूचा वापर अधिक कार्यक्षम रीतीने करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरु आहेत.

<><><><><><>

भारताचा ध्वज असलेल्या 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या दोन एलपीजीवाहू जहाजांनी काल 'होर्मुझची सामुद्रधुनी' सुरक्षितपणे पार केली. ही जहाज आज मुंद्रा आणि कांडला बंदरांवर पोहोचतील. ९२ हजार७०० टन एलपीजी त्यातून आणला जात आहे. भारताच्या आणखी २२ जहाजांचा  मार्ग मोकळा करण्याकरता प्रयत्न चालू असल्याचं नौवहन  मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल नवी दिल्ली इथे आयोजित आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितलं.

<><><><><><>

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सीबीएसई ने पश्चिम आशिया भागात उद्यापासून सुरु होणारी  बारावीची  परीक्षा रद्द केली आहे. याआधी १ मार्च ते ९ मार्चदरम्यान होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या, परंतु त्याही आता रद्द केल्याची घोषणा सीबीएसई ने केली आहे. पश्चिम आशिया भागातल्या बारावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करण्याच्या प्रक्रियेबद्दल पुढील काळात माहिती देण्यात येईल असं मंडळाने म्हटलं आहे.

<><><><><><>

कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून या  माध्यमातून शेतीचा उत्पादन खर्च हा २५%  कमी झाला आहे, तर उत्पन्न मात्र वाढल्याचं प्रतिपादन  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. राहुरीच्या  महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३९ वा पदवीदान समारंभात ते  आज बोलत होते. राज्यामध्ये केलेली कर्जमाफी ही तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना आहे मात्र शाश्वत शेतीचं दीर्घकालीन प्रारूप तयार करण्यात  राज्य सरकार सह इतर संस्था आणि कृषी स्नातकांनी वाटा उचलावा असं आवाहन त्यांनी केलं....

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल जिष्णू देव वर्मा होते. त्यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मानद डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानीत करण्यात आलं. कृषी विद्यापीठाच्या स्नातकांनी, संशोधन, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि यावर भर द्यावा, असं आवाहन राज्यपालांनी केलं.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे उपस्थित होते. विविध विद्याशाखांतल्या एकूण ४ हजार ६०२ स्नातकांना या सोहळ्यात पदवी, पदव्युत्तर पदवी , आणिआचार्य पदवीने गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

भारतीय कापूस महामंडळ-सी.सी.आय. राज्यात हमीभावाने कापसाची खरेदी आजपासून बंद करणार असल्याच्या पार्श्वभूमीवर याला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. कापूस अद्याप शिल्लक असल्यानं ही मागणी करण्यात आल्याचं नमूद करण्यात आलं आहे. पहिल्या टप्प्यातल्या एफएक्यू दर्जाचा कापूस संपल्याचा दावा करत सी.सी.आय.नं खरेदी बंद करत असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आज संध्याकाळी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेणार आहेत. आसाम तमिळनाडू केरळ पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरीच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम ते जाहीर करण्याची शक्यता आहे. या पाचही ठिकाणच्या मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणानंतर अंतिम मतदार याद्या निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केल्या आहेत.

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्याच्या मागणीला समाजवादी पक्षाचा पाठिंबा असल्याचं पक्षाचे अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी सांगितलं. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. ज्ञानेश कुमार हे कर्तव्याबाबत प्रामाणिक नसल्याचा आरोप यादव यांनी केला. विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही

सभागृहामधे ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्याची मागणी करणारी नोटीस दिली आहे. लोकसभेचे १३० आणि राज्यसभेच्या ६३ खासदारांनी यावर स्वाक्षरी केली आहे. ज्ञानेश कुमार हे विरोधी पक्षांसोबत भेदभाव करतात, सत्ताधारी पक्षाला नेहमी झुकतं माप देतात, सखोल पुनरीक्षणाच्या माध्यमातून त्यांनी लाखो लोकांना मतदानापासून वंचित ठेवलं असे आरोप विरोधी पक्षांनी केले आहेत. देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांवर महाभियोग चालवण्यासाठी नोटीस देण्याची ही देशाच्या इतिहासातली पहिलीच वेळ असल्याचं सांगितलं जात आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून सुरू होणाऱ्या 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' स्पर्धेतल्या विजेत्यांशी - संवाद साधणार आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरता आणि 'विकसित भारत' घडवण्याबाबत दृष्टिकोन मांडण्याकरता युवकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परकीय गुंतवणुकदारांनी भारतीय शेअर बाजारातून मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात ५२ हजार ७०४ कोटी रुपये काढून घेतले. रुपयाचं अवमूल्यन, कच्च्या तेलाचे दर वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीवर होणारा आणि भांडवली उत्पन्नावर होणारा परिणाम ही भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब असल्याचं सांगितलं जात आहे. फेब्रुवारी महिन्यात भारतीय बाजारात २२ हजार ६१५ कोटींची परकीय गुंतवणूक झाली होती. ही गेल्या सतरा महिन्यातली सर्वात मोठी गुंतवणूक होती. त्याआधीचे सलग तीन महिने परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून गुंतवणूक काढून घेतली होती.

<><><><><>

राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवर प्रवास करणाऱ्या खाजगी वाहनधारकांसाठी फास्टॅगच्या वार्षिक पासचं शुल्क पंच्याहत्तर रुपयांनी वाढलं असून हे वाढीव शुल्क येत्या १ एप्रिलपासून लागू होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ही घोषणा केली आहे. सध्या

३ हजार रुपयांचा असलेला हा वार्षिक पास आता १ एप्रिलपासून ३ हजार ७५ रुपयांना मिळणार आहे.

<><><><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ BCCI चा 'नमन पुरस्कार ' सोहळा आज नवी दिल्लीत होणार आहे. दिग्गज खेळाडू रॉजर बिन्नी आणि राहुल द्रविड यांना 'कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कारा' ने गौरवण्यात येईल. भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज हिला, 'BCCI महिला जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित केलं जाईल. २०२४-२५ या क्रिकेट हंगामातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे पुरस्कारही या शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात येतील. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून शुभमन गिल आणि स्मृती मानधना यांचा गौरव होईल. सर्वोत्कृष्ट देशांतर्गत खेळाडूचा मान आयुष म्हात्रे आणि इरा जाधव या मुंबईकरांनी पटकावला आहे. देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांच्या आयोजनासाठीचा पुरस्कार मुंबई क्रिकेट संघटनेला मिळाला आहे.

<><><><><><>

येत्या दोन दिवसांत बीड आणि परभणीत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तसंच मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात पुणे, सिंधुदुर्ग, नाशिकचा घाटमाथा इथं हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची तर कोल्हापूर, सातारा, सांगली इथं वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

//<><><><><><>//